जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६३० दिनांक - १८/०८/२०२३**

भरोसा सेल,गुन्हे शाखा,पुणे शहर

# “आरोग्यवती भव”

प्रत्येक कुटुंबाचा सर्वात भक्कम आधार एक स्त्रीच असते. कुटुंबासाठी तिची जीवनशैली कायम व्यस्त असते. या व्यस्त जिवनशैलीत ती स्वतःकडे कधीच लक्ष देत नाही. त्या स्त्रीला स्वतः विषयी जाणीव करुन देण्यासाठी “आरोग्यवती भव” हा आगळा वेगळा उपक्रम पुणे शहर पोलीस आयुक्तालयात राबविण्यात आलेला आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयात मा.श्री रितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा.संदीप कर्णिक, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली रुबी हॉल हॉस्पिटलच्या सहकार्याने शिवाजीनगर पोलीस वसाहत व स्वारगेट पोलीस वसाहतीमधील पोलीस कुटुंबातील महिलांसाठी दि.१०/०८/२०२३ व दि.११/०८/२०२३ रोजीचा वैद्यकिय कॅम्प यशस्वीरित्या पार पाडला. यामध्ये जवळपास ४०० पोलीस कुटुंबियांनी आपली वैद्यकिय चाचणी करुन घेण्यात सहभाग दर्शविला. दि.१७/०८/२०२३ वैदयकिय चाचणीचे रिपार्ट त्यांना वाटप करुन त्याबाबतचे विश्लेषण रुबी हॉल हॉस्पिटल डॉक्टरांकडुन करण्यात आले व त्याअनुषंगाने त्यांची वैद्यकीय तपासणी, मार्गदर्शन व औषधोपचार पुरविण्यात आले.

सदर कार्यक्रमास मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या पत्नी श्रीमती अनुप्रिया कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांच्या पत्नी श्रीमती प्रिया कर्णिक,डॉ.स्वाती पोकळे, डॉ.सुरेखा चावरिया, श्रीमती रुपाली झेंडे, श्रीमती तेजश्री पवार, डॉ.तेजश्री रानडे, रुबी हॉल हॉस्पीटलचे डॉ.प्रसाद मुगलीकर-डायरेक्टर मेडिकल सर्व्हिसेस, प्रभाकर श्रीवास्तव-जनरल मॅनेजर हयुमन रिसोर्स, ऋषिकेश खांदवे-जनरल मॅनेजर मार्केटिंग, डॉ.रश्मी भामरे, स्त्रीरोग तज्ञ, डॉ.देबाशिश देसाई-संसर्गजन्य रोग तज्ञ तसेच त्यांची टिम व टेक्निशियन, शिवाजीनगर पोलीस हॉस्पिटलचे डॉ.राऊत, डॉ.देशपांडे, डॉ.क्षिरसागर व त्यांची टीम, स्वारगेट पोलीस हॉस्पिटलचे डॉ.जगदाळे व त्यांची टीम, होप फॉर चिल्ड्रेन फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचे श्रीमती कॅरोलीन व त्यांची टीम, मुस्कान या स्वयंसेवी संस्थेचे श्रीमती शुभदा रणदिवे व त्यांची टीम, भरोसा सेलचे वपोनि. अनिता मोरे, संगिता जाधव, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे वपोनि.निलीमा पवार, मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे पो.नि.(गुन्हे)स्वप्नाली शिंदे व इतर पोलीस अधिकारी आणि अंमलदार हजर होते.





